आजचा दिनविशेष
१५१९ : फर्डिनांड मॅगेलन पाच जहाजे घेऊन पृथ्वी प्रदक्षिणाला निघाले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com | LOK AARAMBH | संपादक:राहुल मारोतीराव वाईकर | कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार १० ऑगस्ट २०२५ | अंक २३२० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

SUN Tourism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007
All TOURS घर से घर तक दिल से दिल तक
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

# इंडिया आघाडीचा केंद्राला घाम फोडणारा निर्णय, आता थेट एल्गारच



## उद्धव ठाकरे आणि राहुल गांधींच्या सीक्रेट मिटिंगमध्ये काय ठरलं?

निवडणूक आयोग आणि भाजपने मिळून मतं चोरल्याचा गंभीर आरोप काँग्रेस नेते राहुल गांधींनी दोन दिवसांपूर्वीच केला होता. पत्रकार परिषद घेत त्यांनी मोठा बॉम्ब टाकला असून हा मुद्दा आता चांगलाच पेटला आहे. गेल्या आठवड्यात इंडिया आघाडीचीही बैठक दिल्लीत पार पडली. राहुल गांधी आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची स्वतंत्र बैठक होऊनही चर्चा झाली. त्यानंतर निवडणूक आयोगाविरोधातील लढा तीव्र करण्याच निर्णय घेण्यात आला असून अवघ्या दोन दिवसांनी म्हणजे सोमवार, 11 ऑगस्ट रोजी इंडिया आघआडीतर्फे निवडणूक आयोगविरोधात मोर्चा काढत एल्गार पुकारण्यात येणार आहे. याच पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनीही आज माध्यमांशी संवाद साधताना या विषायवर बोलत बरेच खुलासे केले.

### 35 मिनिटांच्या बैठकीत काय झाली चर्चा ?

उद्धव ठाकरे हे तीन दिवनस दिल्लीत मुक्कामी होते, त्यांना राहुल गांधींनी आग्रहाचं निमंत्रण दिलं होतं. त्यानुसार उद्धव ठाकरे आले, राहुल गांधींनी निवासस्थानी, स्पेशल स्क्रीन लावून निवडणूक आयोगाच्या घोटाळ्यासंदर्भातील स्पेशल प्रेझेंटेशन दाखवलं तिथे. आम्ही ते नीट पाहिलं, समजून घेतलं. त्यानंतर भोजन व नंतर राहुल गांधी यांच्या निवासस्थानी मोजक्या लोकांची एक बैठक झाली. त्यावेळेस राहुल गांधी, खर्गे, उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, इतर प्रमुख नेते उपस्थित होतो. त्या बैठकीत राजकारणाची पुढील रूपरेषा ठरली, अनेक विषयांवर चर्चा झाली, असं राऊत म्हणाले.

उद्धव ठाकरे व राहुल गांधींच्या बैठकीत नेमकं काय घडलं, काय ठरलं, हेही त्यांनी सांगितलं. निवडणूक आयोगाच्या घोटाळ्याविरोधात लढाई अधिक तीव्र करण्याचा निर्णय या दोन्ही नेत्यांच्या भेटीत ठरल्याचं राऊत म्हणाले.

# पाणी साचल्यामुळे नागरिक व व्यापाऱ्यांची गैरसोय मोहनदादा जगताप यांच्या पुढाकाराने पाहणी

| माजलगाव प्रतिनिधी – माजलगाव शहरातील बीड रोडवर सतत होणाऱ्या पावसामुळे पाणी साचण्याची समस्या निर्माण झाली आहे. यामुळे नागरिक आणि व्यापाऱ्यांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. ही बाब लक्षात घेऊन समाजसेवक मोहनदादा जगताप यांनी तत्काळ लक्ष घालत, नगर परिषदेचे मुख्याधिकारी निगळ साहेब तसेच इंजिनियर मारोती गिते साहेब यांच्यासह प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या पाहणी दरम्यान त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना लवकरात लवकर योग्य ती उपाययोजना करून पाणी साचण्याची समस्या कायमची दूर करण्याच्या सूचना दिल्या. या वेळी परिसरातील पदाधिकारी, व्यापारी, नागरिक आणि पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सामाजिक कार्यकर्ता फैमिदा काझी यांनी घेतली पोलिस अधिक्षक नितिन बगाटे सरांची भेट



रत्नागिरी:दिनांक 08/08/25 रोजी , लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र रत्नागिरी चे अध्यक्ष फैमिदा काझी,तसेच संवाद सोशल फाउंडेशन च्या संस्थापिका व राज्य अध्यक्ष व मानव अधिकार सामाजिक सुरक्षा संघ महाराष्ट्र राज्यध्येक्ष पदी कार्यरत असलेल्या क्षीमती फैमिदा काझी, आणि फरहा मुजावर यांनी रत्नागिरी जिल्हा पोलिस अधिक्षक मा.नितिन बगाटे सर यांची भेट घेऊन त्यांना पुष्पगुच्छ देउन सदिच्छा भेट दिली

## माजलगावात मटका-गुटखा माफियांना ऊत!
# पोलिस बघ्याची भूमिका?

माजलगाव प्रतिनिधी बीड जिल्ह्यात उपद्रवी अवैध धंद्यांवर आळा घालण्यात धडाकेबाज पोलिस अधीक्षक नवनीत कावत साहेबांनी कठोर कारवाई करून गुटखा किंग, वाळू तस्कर आणि मटका किंग यांना गुडघे टेकवले होते. काही काळ शांतता होती... पण आता पुन्हा माजलगावात मटका माफियांचे डोके वर! शहरातील जुना मोढा परिसर ते विविध टपऱ्यांवर खुलेआम मटका खेळ चालू असून, या जुगाराने अनेक गोरगरीब मजुरांचे संसार उध्वस्त होत आहेत. लोकांच्या हाती मोबाईल आणि पैजेसाठी पैसे येतात, पण घरात चुल पेटवण्यासाठी नाही—अशी वेळ येत आहे. शहरातील नागरिक विचारत आहेत—"बिट अमलदार करतात तरी काय?" अवैध धंदे छुप्या पद्धतीने दिवसेंदिवस वाढत आहेत, आणि संबंधितांना कायद्याची किंचितही भीती उरलेली नाही. यामुळे वाळू तस्कर, गुटखा विक्रेते आणि मटका किंग यांना पुन्हा ऊत आला असून, माजलगाव शहरातील पोलिस निरीक्षक सूर्यतळ यांनी दोषींवर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी जनतेतून जोर धरत आहे.

# तीर्थक्षेत्र जांब समर्थ येथे शिवलीला अमृत ग्रंथ सांगता तसेच महारुद्र अभिषेक पोर्णिमा महोत्सवाला प्रारंभ

रामेश्वर तांगडे प्रतिनिधी/तीर्थक्षेत्र जांब समर्थ श्री समर्थ मंदिर मध्ये श्रावण पोर्णिमा निमित्त दिनांक 9/8/2025 शनिवार रोजी शिवलीला अमृत ग्रंथाची सांगता वेदशास्त्र संपन्न प्रवक्ते प्रभाकर अण्णा जोशी यांच्या हस्ते तसेच काल्याचे किर्तनकार ह भ प पांडुरंग महाराज आनंदें यांनी केले आहे या कार्यक्रमास जांब समर्थ ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते त्यामध्ये महिलांचा सहभाग तर खूपच होता श्री समर्थ मंदिर ट्रस्ट चे उपाध्यक्ष बाबासाहेब बाप्पा तांगडे



सहसचिव संजय बाप्पा तांगडे तसेच प्रकाश अण्णा तांगडे या कार्यक्रमाचे विशेष म्हणजे या कार्यक्रमांतर्गत पुढील बाराही महिने पौर्णिमा उत्सव अगदी आनंदात अन्नदान अध्यात्म आणि महारुद्र अभिषेक होणार आहे या अनुसंगाने अध्यात्म कमिटी गठीत करण्यात आले आहे त्यामध्ये भागवत दामोधर तांगडे, मुंजाबा गंगाधर तांगडे, अनंता श्री किसन तांगडे, बालासाहेब मधुकर तांगडे, धनंजय भाऊ देशपांडे, परमेश्वर बारहाते, शिवाजी उत्तमराव तांगडे, विकास नारायण धुरट, श्रीधर अंबादास जोशी, मधुकर रंगनाथ तांगडे, राजेंद्र प्रभाकर तांगडे, अण्णासाहेब श्रीराम तांगडे, महेश प्रभाकर तांगडे, विलास माधवराव तांगडे, एकनाथ नामदेव तांगडे, प्रकाश अण्णा हरिभाऊ तांगडे, भास्कर गणपतराव तांगडे, नारायण दादा नामदेव तांगडे, महेश प्रभाकर जोशी, रमेश राव शेषेराव भुतेकर, रामेश्वर आबासाहेब तांगडे, विष्णू रामभाऊ तांगडे, संभाजी निळोबा तांगडे, सुरेश मदनराव तर, सुदर्शन आप्पासाहेब तांगडे यांचा प्रामुख्याने समावेश आहे प्रति पौर्णिमेला या कमिटीतील दोघा जणांनी या कार्यक्रमाचा भार उचलायचा आहे असे या कमिटीच्या अंतर्गत ठरले आहे

# सदोष मनुष्यवधाच्या गुन्ह्यात सहा आरोपींची निर्दोष मुक्तता! :

बीड जिल्ह्यातील आहेरवडगाव येथे २०१८ मध्ये झालेल्या मयत विलास गंगाधर देशमुख यांच्या सदोष मनुष्यवधाच्या बहुचर्चित प्रकरणात जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड यांनी सर्व सहा आरोपींना निर्दोष मुक्तता दिली.२२ मार्च २०१८ रोजी विकास विलासराव देशमुख यांनी बीड ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा क्र. ९०/२०१८ कलम ३०४, १४७, ३२३, ५०४ भा.दं.वि. अंतर्गत तक्रार दाखल केली होती. शेतीच्या वादातून झालेल्या मारहाणीत मृत्यू झाल्याचा आरोप रावसाहेब केशव मोरे, अशोक रावसाहेब मोरे, बाबुसाहेब मोरे, इंदुबाई रावसाहेब मोरे, कौशल्याबाई भास्कर शिंदे आणि मिनाबाई अशोक शिंदे यांच्यावर होता. तपासात १७ प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब नोंदवले गेले.

# बीड जिल्ह्यामध्ये गावठी कट्टा तसेच घातक शस्त्र वापरणाऱ्या च्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ झाली असून,बीड जिल्ह्यात गावठी कट्टे पुरवणाऱ्याचा शोध घेणे पोलिसापुढे आवाहन झाले आहे.

बीड जिल्हामध्ये अवैध गावठी कट्टा बाळगणाऱ्या ईसमांची माहीती काढुन गावठी कट्टा बाळगणाऱ्या ईसमांवर कडक कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक बीड यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. यावरुन दिनांक 09.08.2025 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाला माहीती मिळाली की, तकीया मज्जीद जवळ, लेंडी रोड, उपविभागीय वन कार्यालय गेट जवळ एक फिकट निळ्या रंगाचे टिशर्ट व निळी पॅट घातलेल्या ईसमाने त्याचे कंबरेला गावठी कट्टा लावलेला आहे व कोणाची तरी वाट पाहत थांबलेला आहे. अशी बातमी मिळाल्यावरुन लागलीच पथक रवाना होवुन पथकाने लेंडी रोड, वनविभागाचे समोरील परीसरातुन ईसमनामे सागर उर्फ सनी प्रकाश मोरे, वय 24 वर्ष, रा. खडी क्रशरच्या बाजुला, जुना धानोरा



रोड, जिजाऊ नगर, बीड यास ताब्यात घेवुन त्याचे कंबरेला एक लोखंडी गावठी बनावटीचे पिस्तुल मिळुन आले. त्यानी सदरील पिस्तुल वैभव संजय वराट रा. चक्रधरनगर, बीड व रितेश प्रभाकर वडमारे रा.राजुरी वेस, बीड या दोघांनी दिल्याचे सांगीतले. त्याचेकडुन किंमती 40,000 रु पिस्तुल जप्त् करुन तिनही आरोपीविरुदध पोलीस ठाणे बीड शहर गु.र.नं 153/2025 कलम 3/25 शस्त्र अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही कामगिरी ही नवनित काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक बीड, शिवाजी बंटेवाड, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, बीड याचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार विकास राठोड, आनंद म्हस्के, राहुल शिंदे, अंकुश वरपे, पोलीस अंमलदार मनोज परजणे, आशपाक सय्यद, अर्जुन यादव, यांनी केली आहे. बीड जिल्ह्यामध्ये गावठी कट्टे येतात कुठून याच्या मुळाशी जाऊन कारवाई करण्याची गरज आज बीड पोलिसांना आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
रविवार १० ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

# महाराष्ट्रात मतचोरी

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गुरुवारी पुन्हा एकदा निवडणूक आयोगावर लोकसभा व विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये गैरप्रकार केल्याचा आरोप केला. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत ४० लाखांहून अधिक मते संशयाच्या भोव–यात आहेत, असे राहुल गांधी म्हणाले. निवडणूक आयोग या याद्यांबाबत गप्प का, असा सवालही त्यांनी केला. त्यांनी यावेळी पुराव्यानिशी सादरीकरण करीत निवडणूक आयोगाने भाजपशी संगनमत करून निवडणुकाच चोरल्याचा गंभीर आरोप केला. राहुल गांधी यांनी गुरुवारी मतदार यादी पडताळणीतील अनियमिततेवर सादरीकरण केले. महाराष्ट्र आणि कर्नाटकची मतदार यादी पडद्यावर दाखविताना दोन्ही राज्यांच्या मतदार यादीत संशयास्पद मतदार आहेत, असे ते म्हणाले. महाराष्ट्राचे निकाल पाहिल्यानंतर निवडणूक चोरी झाली आहे याची खात्री पटली. आयोगाने मशिन रिडेबल मतदारयादी न दिल्याने, आम्हाला खात्री पटली आहे की, निवडणूक आयोगाने भाजपशी संगनमत करून महाराष्ट्राची निवडणूक चोरली आहे. त्याचप्रमाणे कर्नाटकात वेगवेगळ्या बुथच्या मतदार यादीत एकाच व्यक्तीचे नाव आहे. यादीत अनेक ठिकाणी लोकांचे फोटो नाहीत. त्याचवेळी, अनेक ठिकाणी बनावट पत्ते लिहिले गेले आहेत, असेही ते म्हणाले. महाराष्ट्रात जी विधानसभा निवडणूक पार पडली, त्यावेळी पाच महिन्यांत इतके मतदार वाढले जे मागच्या पाच वर्षांत वाढले नव्हते. महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीनंतरच्या पाच महिन्यांत ४० लाख मतदार वाढले. ही बाब आश्चर्यकारक होती. तसेच संध्याकाळी ५ वाजल्यानंतर मतदार मोठ्या प्रमाणावर वाढले. महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीत आम्हाला घवघवीत यश मिळाले. मतांची चोरी पाच मार्गांनी करण्यात आली. भाजपने मतांची चोरी कशी केली ते राहुल गांधींनी सांगितले. पाच प्रकारे ही चोरी करण्यात आली. डुप्लिकेट व्होटर्स म्हणजे एका मतदाराचे नाव मतदार यादीत जास्त वेळा येणे, खोटे तपशील आणि पत्ते. मतदारांचे खोटे पत्ते देऊन आणि बनावट ओळख निर्माण करून एकाच पत्त्यावर ५० ते ६० लोक राहत असल्याचे दाखवण्यात आले. प्रत्यक्षात त्या ठिकाणी ४ ते ५ लोकच राहत होते. चुकीचे फोटो वापरण्यात आले, जे मतदार यादीत स्पष्ट दिसणार नाहीत. फॉर्म ६चा दुरुपयोग करूनही मतदार याद्यांमध्ये घोळ केला गेला. राहुल गांधींनी कर्नाटकातील बंगळुरू–मध्य लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीचा दाखला दिला. येथील सातपैकी सहा विधानसभा मतदारसंघांमध्ये काँग्रेसला मताधिक्य होते. मात्र महादेवपुरा विधानसभा मतदारसंघामध्ये भाजपला १ लाख २५० इतके मताधिक्यावर पक्षाचा खासदार निवडून आला. महादेवपुरात मतदारांचे खोटे पत्ते, एकाच पत्त्यावर अनेक मतदार, एकाच मतदाराकडून अनेक मतदान केंद्रांवर मतदान, छायाचित्रांमध्ये गोंधळ, नकली नवे मतदार असे प्रकार आढळल्याचा आरोप त्यांनी केला. कुठल्याही एका विधानसभा मतदारसंघामध्ये मतांची चोरी केली तर केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मदतीने भाजपला निकाल फिरवता येऊ शकतो, हे सिद्ध होते. हा पॅटर्न देशभर वापरता येऊ शकतो, असे ते म्हणाले. महाराष्ट्रामध्ये महाविकास आघाडी लोकसभा निवडणूक जिंकते, पण पाच महिन्यांनी झालेल्या विधानसभा निवडणुकीत पराभव होतो, हा निकाल अचंबित करणारा होता. या निकालामुळे निवडणूक घोटाळा होत असल्याचा संशय बळावला. महाराष्ट्रात पाच वर्षांत जितके मतदार वाढले नाहीत त्यापेक्षा जास्त मतदारवाढ अवघ्या पाच महिन्यांमध्ये झाल्याचे दिसले. निवडणूक आयोग इलेक्ट्रॉनिक डेटा का देत नाही, आम्ही वारंवार आयोगाकडे डेटा मागितला पण आम्हाला तो देण्यात आला नाही असे राहुल गांधी म्हणाले. निवडणूक आयोगाने आम्हाला उत्तर देण्यासाठी नकार दिला. देशात बनावट मतदान होत आहे. ही चोरी पकडण्यासाठी आम्हाला बराच वेळ लागला. डुप्लिकेट मतदारांची संख्या खूप जास्त आहे. तीन वेळा मतदान करणारे ११ हजार संशयास्पद लोक आहेत. मतांची चोरी कोठेही झालेली नाही. मात्र राहुल गांधींच्या डोक्यातील चीप चोरीला गेली असून हार्डडिस्क करप्ट झाली आहे. सांविधानिक संस्थांना बदनाम करण्याचे काम राहुल गांधी करीत असून जनता त्यांना धडा शिकवेल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. तर तुम्ही मतांची चोरी करून तेलंगण, कर्नाटकमध्ये निवडणुका जिंकल्या का असा सवाल करून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, तुम्ही जिंकता तेव्हा निवडणूक आयोग चांगला, मतदान यंत्रे चांगली. पण तुम्ही हरला तर सर्वांना दोष देणार. यामुळेच जनतेने तुम्हाला जागा दाखवली. राहुल गांधींनी मतदार यादीतील घोटाळ्याचे कथित पुरावे सादर केल्यानंतर निवडणूक आयोगाने स्पष्टीकरण देताना, हे आरोप चुकीचे असल्याचे म्हटले आहे.

# पानिपतावर गमावलेला आत्मविश्वास जागवणारी राक्षसभुवनची लढाई

## बीड जिल्हा इतिहास दिन – १० ऑगस्ट

**प्रो.डॉ. मुकुंद देवर्षी**
**इतिहास विभाग प्रमुख,**
**श्री. सिद्धेश्वर महाविद्यालय**
**माजलगाव जिल्हा बीड.**
**Email- dr.devarshima@gmail.com**
**मोबाईल - 9405357260**



महाराष्ट्र हा राकट प्रदेश, दगडांचा प्रदेश. तो आमचा प्रदेश आहे. अन्य प्रदेश भलेही सुंदर असतील पण आमचा राकट प्रदेश आंम्हाला प्रिय आहे. महाराष्ट्राच्या ऐतिहासिक जडणघडणीत सांस्कृतीक क्षेत्रात गोदाकाठच्या मराठवाड्यातअनेक संतांनी आपल्या कर्तुत्ववान कालखंडात किर्ती प्रस्थापित केली. यप्रदेशामधील बीड हा अशा सत्तांच्या जहागिरीचा साक्षीदार असलेला जिल्हा. सत्तेच्या राजकारणातील घडामोडी अथवा लढायातील जय पराजयाची मिमांसा इतिहासात केली जाते. अशा सत्तापटलाच्या सारीपाटावर बीडमध्येही अनेक सत्तांचे संघर्ष घडुन आले. बीड हे जिल्ह्याचे ठिकाण असुन त्याचे पूर्वीचे वेरुळ लेण्यातोल शीलालेखावरु- श्रीवर्धन (शके ११५६) नाव असल्याचे मत डॉ. ब्रह्मानंद देशपांडे यांनी मांडले. तसेच या देशाची ओळख कलिंददेश म्हणून होती. बीड या प्रशासकीय मुख्यालयाचा उल्लेख पंढरपुर येथील ८४ च्या शिलालेखात आहे. बीड हे बील किंवा बीड चे तद्भवरुप असुन त्याचा अर्थ राजधानी किंवा सैन्याचा तळ असा होतो. यावरुन हे एखाद्या राजसत्तेचे प्राचीन काळापासून महत्वाचे सैन्यतळाचे ठिकाण असावे. भौगोलिकदृष्ट्या बीड हे अनेक महत्वपूर्ण नगरांना जोडणारे मध्यवर्ती ठिकाण होते. भास्कराचार्यांच्या लिलावती या ग्रंथात बीडचे वर्णन बिज्जल बीड असे आहेः महोम्मद् तुघलक याने या शहरातील पाणी पाहुन तो चकीत झाला व त्यास भीर हे नाव बहाल केले. या फारशी शब्दाचा अपभ्रंश होऊन ते वर्तमानातले बीड अस्तित्वात आहे.या विभागातील मध्ययुगीन इतिहासात महत्वपूर्ण घटना म्हणजे राक्षसभुवनचे युद्ध होय. या युद्धाने या प्रदेशातील राजकीय जीवनावर छाप उमटवली. या घटनेचे महत्व जाणुन १० ऑगस्ट हा दिवस इतिहास दिन म्हणून इतिहास संकलन समिती साजरा करते. या युद्धाच्या अनुषंगाने काही गोष्टींची मांडणी पुढील प्रमाणे करता येते. मध्ययुगीन महाराष्ट्रात ध्येयहीन निरर्थक जीवन जगणाऱ्या मराठ्यांना स्वराज्य कार्यासाठी एकत्र करून छत्रपतीशिवाजींनी स्वराज्याची निर्मिती केली. गलीतगात्र मनाला उत्तेजित करून, शौर्यास चालना दिली. स्वाभिमान व स्वत्वाचीजाणीव करून देऊन स्वराज्याचा विस्तार केला. न्या. रानडे यांनी मराठी सत्तेचा उदय या ग्रंथात, शिवशाही हा राष्ट्र निर्मितीचा भारतातील पहिला प्रयोग असल्याचे मांडले आहे. ते शिवरायांना राष्ट्रवादाचे जनक मानतात. म्हणजे शिवाजींनी केवळ एका राजघराण्याची स्थापना केली नाही तर राष्ट्राची निमिती केली होती. त्यांचा वारसा जपत पेशवा बाजीराव यांनी मराठी सत्तेचा दबदबा भारतवर्षात निर्माण करून प्रमुख सत्तेचा मान महाराष्ट्रला मिळवून दिला होता.

कट्टर पंथीय शहावली उल्लाह याच्या पुढाकारातून नजीबखान रोहिला याने अफगाणिस्तानचा बादशहा अहमदशहा अब्दाली याला पाचारण केले होते. त्याच्या मदतीने मोघलांना दूर करून दिल्लीवर पठाणांची सत्ता आणतानांच, उत्तरेतील मराठयांचे प्रभुत्व नष्ट करावयाचे होते. त्याप्रसंगी राष्ट्रीय धर्मनिरपेक्ष विचार करणारे व अब्दाली हा परकीय शत्रु असल्याने त्याला रोखले पाहिजे या राष्ट्रीयत्वाच्या भूमिकेने प्रेरित होऊन मराठे हे दिल्लीची बादशाही रक्षिण्यासाठी अहमदीया करारानुसार पनिपतावर गेले होते. तेघील युद्ध भूमीवर १४ जानेवारी १७६१ रोजी मकर संक्रातीला महाराष्ट्रातील लक्षावधी माता- भगिनींच्या बांगड्यांचा चुराडा झाला होता. कित्येक घरातील कुंकवाचा करंडा पानिपतावर लवंडला गेला. मराठी माणसाचे मन छत्रपती शिवाजींचे नाव घेतल्यावर जसे अभिमानाने फुलून येते, तसेच पानिपताचे नाव घेतल्यावर दुःखाने हळवे होते. केवठ ९ तास चाललेल्या या झुंजीत जवळपास दीड लाख मांणस मृत्यू पाडण्याचा हा भारतीय जीवनातील महत्वाचा प्रसंग होता. याने मराठ्यांच्या प्रभत्वाला धक्का पोहचून मराठे हिंदुस्थानच्या राजकारणातून संपले असा ग्रह त्यावेळी रूढ झाला होता. पेशवा नानासाहेबांच्या मृत्यूनंतर सत्तेवर आलेल्या १७ वर्ष वयाच्या पेशवा माधवराव यांच्यासमोर गमावलेली प्रतिष्ठा व विश्वास पुन्हा अर्जीत करण्याचा मोठा प्रश्न होता. त्याने निजामाविरूध्द राक्षभुवन येथील युध्दात विजय मिळवून आत्मविश्वास संपादन केलाच पण काही काळ पुन्हा मराठी सत्तेला अखिल भारतीय सत्तेचा दर्जाही प्रदान केला. त्या घटनेस १० ऑक्टोंबर २०२५ ला २६२ वर्ष पूर्ण झाली.केंद्रीय सत्ता दुबळी होऊन अनेक सरदार स्वार्थी हेतूने पेशव्यांना अडचणीत आणीत होते. काका रघुनाथराव व पेशवा माधवराव या सत्तेच्या सारीपाटावर प्रभुत्व कोणाचे असावे यावरून संघर्ष करत होते. मराठी दरबाराची परिस्थिती यावेळी अतिशय चमत्कारिक होती. रिकामा खजीना, शौर्य असले तरी आपसात चुरस व वैमनस्य, परस्परांविषयी मतभेद व स्वार्थीवृत्ती ही पसरलेली होती. पेशवे पद हे भोगण्यासाठी नाही तर झिजण्यासाठीच आहे अशी धारणा माधवराव पेशव्यांची होती. त्याला आव्हान मात्र त्याच्या घरातूनच काका रघुनाथरावांकडून होते. त्यात भर म्हणून मराठ्यांचे सरदार गोपाळराव पटवर्धन, नागपूरकर जाणोजी भोसले, सेनापती रामचंद्र जाधव, भवानराव प्रतिनधी, यमाजी शिवदेव हे नाराजीने अथवा स्वार्थाने निजामास जाऊन मिळाले होते. मराठेशहीचा पंपरागत शत्रु निजाम याने डाव साधला आणि पेशव्यांविरूध्द आघाडी उघडली. या काळात महाराष्ट्रावर प्रभाव पाडणाऱ्या साडेतीन शाह्या पैकी निजामाचा दिवाण व्ठिल सुंदर, भोसल्यांचा दिवाण दिवाकरपंत चोरघडे, राघोबाचा कारभारी सखाराम बापु यांनी मराठेशाही नष्ट करून केंद्रीय सत्ता विभागून घेण्याची योजना आखली होती. विठ्ठल सुंदर परशुरामी (संगमनेर) याने पानिपतावर मराठ्यांचा संहार झाला, त्या संधीचा व पेशव्यांच्या अंतःकलहाचा फायदा घेऊन निजामी सत्ता वाढविण्यासाठी पुण्यावर हल्ला करणे, जानोजीस सातारच्या छत्रपती पदावर विरजमान करप्याचा घाट घालणे, पेशवे पदावरून काका-पुतण्यात कलह निमाण करणे, मराठी सरदारास नजामी पक्षात ओढणे अशा कारवाया आरंभल्याहोत्या. निजामाने त्यास राजा बहादुर प्रतापवंत हा किताब बहाल करून जहागीर दिली. ती गणेश या नावाने ओळखली जाते. राघोबाच्या स्वार्थी राजकारणामध्ये मराठ्यांचे अनेक निष्ठावान सरदार निजामास मिळाले, यातून मराठेशहीवर मोठे संकट चालुन आले.

लढाईचे मैदान शत्रुचा प्रदेश असावा याभूमिकेतून मार्च ते ऑगस्ट १७६३ दरम्यान मराठे व निजाम हे दोन्ही पक्ष परस्परांच्या प्रदेशावर हल्ले करून तो उध्दवस्त करण्यात गर्क होते. निजामाने कराड, सातारा, नाशिक या प्रदेशातथैमान घातले तर मराठ्यांनी मलकापूर, हैद्राबाद या परिसरात तांडव आरंभिले होते. पुढे मराठे वऱ्हाड प्रांतात घुसले तरनिजामाने पुणे शहराकडे मोर्चा वळवला. यावेळी आपसातील वैमनस्याचा पारा इतका वाढला की, रामचंद्र जाधवांनी पंढरपूरच्या पांडुरंग क्षेत्रासही सोडले नाही. निजामाने पर्वतीवर हल्ले केले व पुणे लुटले म्हणण्यापेक्षा मराठ्यांकडूनच ते यशस्वीपणे लुटवले असे म्हणणे योग्य होईल. यावेळी निजामाकडे असलेला मोठा तोफखाना व मराठ्यांचा अनेक सरदारांची लाभलेली साथ या अधारे समोरासमोर पेशव्यांना लुटणे हे त्यांचे उदिष्ट होते.मराठयांनी यावेळेस उदगीर, नळदुर्ग, मेदक,परंडा या भागात हालचाली करून लुट आरंभिली होती. संयमीवृत्तीच्या माधवरावाने चंचल व तापट असलेल्या रखुनाथरावाला स्वस्थ बसून मोहिमेची सूत्रे आपल्या हातात घेतली होती. सरदारांची वतने व जहागीर पुर्वपार चालवण्याची आश्वासने देऊन निजामाच्या गोटात फुट पाडली होती. जानोजी भोसले, गोपाळराव पटवर्धन यांना अलगद बाजुला करण्यात माधवराव यशस्वी झाला होता.निजामअली चा भाऊ बसालतजंग यास भेटीस बोलावून माधवरावाने निजामापुहढे आव्हान उभे केले होते.राक्षसभुवनचे युध्द (१० ऑगस्ट १७६२)एकटा पडत असलेल्या निजामाला गाठण्यासाठी मराठी फौजा मराठवाड्यात घुसल्या होत्या. त्यांनी परंडा,धारूर भागातून निजामाचा मार्ग अडवला होता. निजामाने मार्ग बदलून पावसाळ्याच्या तोंडावर औरंगाबादला मुक्काम हलविण्यासाठी तो हालचाली करत होता. निजामाने मार्ग बदलून धोंडराई ता. गेवराई येथे मुख्य छावणी उभी केली व औरंगाबादचा रस्ता धरला. पावसाळ्याचे दिवस असल्याने गोदावरी दुथडी भरून वाहात होती. मराठे पाठीवर असतांना प्रचंड तोफखाना व फौज घेऊन नदी पार करणे शक्य नव्हते. यावेळी माधवराव फौजेसह ५ ऑगस्टला बीड व ९ ऑगस्टला माजलगाव मुक्कामी होता. निजाम तात्पुरती शिबंदी घेऊन नावा जोडून राक्षसभुवन येथुनगडबडीने पैल तिरांवर तोफखाना व हलक्या तोफा घेऊन पिंपळगाव येथे उतरला होता. तात्पुरती शिबंदी घेउन निजामाने गोदावरी पर केली होती. मात्र त्याची मुख्य फोज, भारी तोफखाना व जड सामान हे विठ्ठल सुंदर यांच्या हाती सोपविले होते. विठ्ठल सुंदर हे गोदावरीत उतरण्याच्या तयारीत आहे अशी बातमी माधवरावास मिळाली होती.आषाढाचा महिना अमावस्येची कळीरात्र, पावसाची संततधार व विजेचा कडकडाट असतांनाही वीरश्रीने संचारलेल्या मराठ्यांनी माजलगांव ते राक्षसभुवन हे अंतर रात्रीतून पार केले. प्रातःसमयी विजेचा लोळ कोसळावा त्याप्रमाणे माधवराव मागे राहिलेल्या विठ्ठल सुंदरच्या ताब्यातील फोजेवर चालून गेला. विठ्ठल सुंदरने घाईने बेसावध फौजेची जमवाजमव केली व लढाई हातघाईवर आली होती. निळकंठ महादेव, विठ्ठल शिवदेव यांनी आघाडी घेतली तर राघोबा दादानीही मध्यभागी मुसांडी मारली. विठ्ठल सुंदरने चपळाईने राघोबास घरले. त्याक्षणी माधवरावाने आपले खाजगी पथक घेऊन युद्धात सामील होऊन रघुनाथरावासं सावरले. विठ्ठल सुंदरची यशस्वी होत असलेली ही योजना माधवरावांच्या समयसुचक व धाडसी पराक्रमाने धुळीला मिळाली. तरी विठ्ठल सुंदर आत्मविश्वासाने संघर्ष करीत होता. मुरादखान या त्याच्याच सैन्यातील सरदाराने विठ्ठल सुंदरचा घात केला व आपल्या अंगरक्षकामार्फत गोळी चालवून त्यास ठार केले. महादजी शितोळे या सरारांनी त्याची फौज गारद केली तर होळकरांच्या सैन्याने विठ्ठल सुंदरचे डोके कापून पालखीतून निजामाकडे पाठविले. पुतण्या विनायक दास, कंधारचे राजे गोपळदास हे मारले गेले. इस्माईल खान, शहाजी सुपेकर, सदाशिव रामचंद्र हे फितूर पळून गेले. निजामाची आठ हजाराची फौज व चार हजार गारदी मारले गेले. तर सोळा सरदारासह उरलेल्या फौजेला कैद करण्यात आले होते. निजाम हताश होऊन गंगेच्या पैलतिरावरून आपली वाताहात डोळ्यांनी पहात होता. या युद्धात पंधरा हत्ती, पंचवीस तोफा, घोडे, युद्ध सामुग्री ही मराठ्यांच्या हाती सापडली. माधवराव विठ्ठल सुंदरच्या हत्तीवर स्वार होऊन धोंडराई छावणीत मुक्कामास गेले होते.या अद्भुत संघर्षास १० ऑगस्ट २०२५ रोजी २६२ वर्ष पूर्ण झाली. त्यानिमित्ताने या घटेचे स्मरण करतानाच काही निष्कर्ष येथे मांडलेले आहेत. या युद्धाने निजामासारख्या धुर्त व बलाढ्य परंपरागत शत्रुला चारीमुंड्या चित करून, पानिपतावरील पराभवामुळे मराठ्यांच्या तलवारीची धार बोथट झाली नाही हे दाखवून दिले. तसेच मराठी सैन्याला आत्मविश्वास प्रदान केला. हा विजय पेशव्यांना जसा उज्वल होता तसाच तो निजामाचा अतिशय अपमान जनक पराभव होता. निजाम मराठ्यास पूर्ण शरण आला. औरंगाबादच्या तहानुसार वांजरा ते औरंगाबाद दरम्यानचा ८२ लक्ष उत्पन्नाचा प्रदेश मराठ्यास द्यावा लागला. यामुळे मराठ्यांचे प्रादेशिक विस्तार जसा झाला तसाच काही अंशी आर्थिक प्रश्नही मिटला. राजकारणातील सत्ता स्पर्धेत काका-पुतन्यांच्या या संघर्षात माधवरावांच्या कर्तुत्वामुळे रघुनाथरावास काही काळ का होईना स्वस्थ बसावे लागले व पेशवे पदावरील हक्क सोडावा लागला. माधवराव यांनी या विजयाने प्रभुत्व स्थापित करून घरभेद्यांना त्यांची जागा दाखवूवन दिली व केंद्रीय सत्तेच्या विरोधात असणाऱ्या सरदारांचा बंदोबस्त करून केंद्रसत्ता मजबूत केली. पानिपतावर मराठे संपले नसून तरूण माधवरावांच्या हाती मराठेशाहीचे भवितव्य सुरक्षित आहे हे या युध्दाने दाखवून दिले. उत्तर भारतात सत्तेची घडी बसवून गतवैभव प्राप्त करून दिले. ग्वालेर, इंदोर, बडोदा ही संस्थाने या विजयानंतर नव्या जोमाने पुन्हा उत्तर भारतात उभी राहिली व प्रत्यक्ष दिल्लीच्या मोघल बादशाहीला संरक्षण देण्याचे धारिष्ठ्य याच राक्षसभुवन युध्दिने मराठ्यांना प्राप्त करून दिले. या युद्धानंतर पेशवा माधवरावांचे नेतृत्व सर्वमान्य होऊन हर एक प्रकारचे कपट, दुष्टावा, वक्रगामीपणा यांचे पीक स्वराज्यात त्यावेळी जोमाने होते. त्याचे उच्चाटन करून न्याय-निती, निःस्पक्षपातीपणा व सार्वननिक हिताचे असे एक नवीनच शिस्तीचे वातावरण या विजयानंतर स्वराज्यात उत्पन्न झाले. निजाम व पेशवे यांच्यातील हा संग्राम गोदावरीच्या दक्षिण तिरावर धोंडराई येथे घडला असे सरदेसाई म्हणतात. मात्र धोंडराई ते राक्षसभुवन हे अंतर ५ ते ८ कि.मी. एवढे असुन मुख्य छावणी धोंडराई येथे होती. निजाम नदी पार करतांना त्याची काही फौज ही राक्षसभुवनावर होती. राक्षसभुवन ते पिंपळगांव हे गोदापात्र हे उथळ होते. त्यामुळे नदी पार करण्याच्या तयारीत असलेल्या सैन्यांबरोबर राक्षसभुवन येथेच हा संग्राम घडून आला. मराठी सत्तेसाठी प्रेरक ठरलेल्या या घटनेचे साधे स्मारक सुध्दा आज अस्तित्वात नाही, शनिचे धार्मिक अधिष्ठान असलेल्या व पुरातन वारसा लाभलेल्या गोदाकाठच्या राक्षसभुवन गावात या घटनेचे एखादे भव्य विजयी स्मारक उभे रहावे व पर्यटन क्षेत्र म्हणून याचा विकास व्हावा ही अपेक्षा.

# यशाचे रहस्य संघर्षात दडलेले आहे. संघर्षाला सलाम करा, यश तुमचेच आहे!

जीवनात संघर्ष हा एक नैसर्गिक घटक आहे. प्रत्येकाच्या वाट्याला आव्हाने येतात, अडथळे येतात, आणि हताशा येते. पण या संघर्षाला घाबरून न जाता त्याचा आदर करणे हीच खरी कला आहे. कारण संघर्ष हा आपल्याला आपल्या मर्यादा ओलांडायला शिकवतो. ज्या क्षणी आपण संघर्षाला स्वीकारतो, त्या क्षणापासून आपल्या आयुष्यातील वाढ सुरु होते. ही वाढ आपल्याला अधिक सक्षम, आत्मविश्वासी आणि यशस्वी बनवते. त्यामुळे संघर्षाला टाळण्याऐवजी, त्याच्याकडे शिकण्याची आणि घडण्याची संधी म्हणून पाहणे महत्त्वाचे आहे. संघर्षाचा आदर करणे म्हणजे स्वतःच्या प्रवासाला मान्यता देणे. आपल्याला यश मिळवण्यासाठी लागणारा प्रत्येक प्रयत्न हा संघर्षातूनच साकार होतो. उदाहरणार्थ, एखाद्या बियाण्याला अंकुरण्यासाठी जमिनीला फोडावं लागतं, पाण्याशी आणि सूर्याशी सामना करावा लागतो. तसंच आपल्या आयुष्यातील प्रत्येक यशाच्या मागे संघर्षाची कहाणी दडलेली असते. त्यामुळे संघर्षाला शत्रू म्हणून न पाहता, त्याला मित्र बनवा. तोच मित्र आपल्याला कठीण प्रसंगात आधार देईल आणि पुढे जाण्याची उर्मी निर्माण करेल. ज्यांना संघर्षाचा आदर करता येतो, तेच व्यक्ती जीवनात खऱ्या अर्थाने पुढे जातात. कारण ते अपयशाला घाबरत नाहीत. अपयश हे फक्त यशाकडे नेणारे पाऊल आहे हे ते समजतात. अशा लोकांचा दृष्टिकोन सकारात्मक असतो. ते प्रत्येक अडचणीतून काहीतरी शिकतात आणि स्वतःला सुधारतात. याच मानसिकतेमुळे ते पुढे जात राहतात. संघर्षाचा आदर करणं म्हणजे आपल्या स्वप्नांना सत्यात उतरवण्यासाठी मेहनतीचा मार्ग निवडणं. संघर्षाशिवाय यश शक्यच नाही. जे लोक सहजतेने मिळणाऱ्या सुखांचा शोध घेतात, ते क्वचितच आयुष्यात मोठं काही साध्य करतात. कारण मोठ्या यशासाठी मोठ्या मेहनतीची आवश्यकता असते. ही मेहनत म्हणजेच संघर्ष. जोपर्यंत आपण संघर्षाचा सामना करत नाही, तोपर्यंत आपण स्वतःच्या क्षमतांना ओळखूच शकत नाही. त्यामुळे यशाचं खरं रहस्य म्हणजे आपल्या संघर्षाचा आदर करणे आणि त्याला स्वीकारणे. संघर्षाचा आदर करण्यासाठी संयमाची आवश्यकता असते. अनेकदा परिस्थिती प्रतिकूल वाटते, प्रयत्न करूनही लगेच परिणाम मिळत नाहीत. अशा वेळी अनेक लोक हार मानतात. पण ज्यांना संघर्षाचा आदर करता येतो, ते धीर धरतात आणि सातत्य ठेवतात. सातत्याने केलेली मेहनत शेवटी यश मिळवून देते. त्यामुळे संघर्षाचा आदर करणे म्हणजे परिस्थितीशी लढत राहणे आणि कधीही हार न मानणे. यश मिळवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्यांपैकी सर्वात महत्त्वाचं कौशल्य म्हणजे आत्मविश्वास. हा आत्मविश्वास संघर्षातूनच मिळतो. आपण जेव्हा अडचणींचा सामना करतो, तेव्हा आपल्या आतली खरी ताकद उलगडते. हळूहळू आपण स्वतःवर विश्वास ठेवायला शिकतो. हा आत्मविश्वास पुढच्या प्रवासात आपल्याला मजबूत करतो. त्यामुळे संघर्षाचा आदर करणे म्हणजे स्वतःचा आत्मविश्वास वाढवणे होय. संघर्षाचं आणखी एक महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे तो आपल्याला नम्र बनवतो. सततच्या यशामुळे अहंकार वाढू शकतो, पण संघर्ष आपल्याला जमिनीवर आणतो. आपण लहान-लहान यशांचाही आनंद घेऊ लागतो. या प्रक्रियेत आपण इतरांच्या कष्टांचाही आदर करायला शिकतो. नम्रतेमुळे समाजात आपली प्रतिमा उंचावते आणि आपल्याला योग्य दिशेने वाढण्याची संधी मिळते. संघर्षाशिवाय व्यक्तिमत्वाची घडण होत नाही. आयुष्यातील प्रत्येक अनुभव आपल्याला काहीतरी शिकवतो, मग तो चांगला असो वा वाईट. संघर्ष आपल्याला आत्मपरीक्षण करायला लावतो. आपल्या कमतरता लक्षात येतात आणि त्यावर काम करण्याची प्रेरणा मिळते. त्यामुळे संघर्षाचा आदर केल्याने आपण सतत शिकत राहतो आणि प्रगती करतो. यशाची व्याख्या प्रत्येकासाठी वेगळी असते. पण त्या यशाकडे जाणारा मार्ग एकच असतो – संघर्षाचा. हा संघर्ष केवळ बाह्य जगाशी नसतो; अनेकदा तो आपल्या आतल्या भीतींशी, शंका-कुशंका आणि आळसाशी असतो. हा अंतर्गत संघर्ष जिंकण्यासाठी आत्मशिस्त महत्त्वाची असते. ज्यांनी संघर्षाचा आदर केला, ते आपल्या अंतर्गत कमकुवतपणांवर विजय मिळवतात आणि खऱ्या अर्थाने यशस्वी होतात. संघर्षाचा आदर केल्याने जीवनात कृतज्ञतेची भावना निर्माण होते. आपण ज्या गोष्टींसाठी मेहनत करतो, त्याच गोष्टींची खरी किंमत आपल्याला कळते. सहज मिळालेल्या गोष्टींचं महत्त्व लवकर कमी होतं, पण संघर्षातून मिळालेलं यश मनाला अभिमान आणि समाधान देतं. त्यामुळे संघर्ष हीच खरी गुरुकिल्ली आहे, जी आनंदाचं आणि समाधानाचं दार उघडते. संघर्षाचा आदर करणं म्हणजे आपल्या स्वप्नांसाठी निष्ठा राखणं. अनेकदा लोक अर्धवट प्रयत्न करून थांबतात. पण जे आपल्या संघर्षाशी प्रामाणिक राहतात, तेच शेवटी आपलं ध्येय गाठतात. ही निष्ठा त्यांना आयुष्यात खऱ्या अर्थाने महान बनवते. म्हणूनच संघर्षाचा आदर करा, त्याला टाळू नका. संघर्षामुळे आपल्यात नेतृत्वगुणही विकसित होतात. जेव्हा आपण अडचणींवर मात करतो, तेव्हा इतरांनाही प्रेरणा मिळते. आपला प्रवास अनेकांसाठी मार्गदर्शक ठरतो. यामुळे समाजात सकारात्मक ऊर्जा पसरते आणि आपण इतरांच्या जीवनात बदल घडवू शकतो. संघर्षाचा आदर करणारा प्रत्येक व्यक्ती भविष्यात इतरांसाठी आदर्श ठरतो. संघर्ष आपल्याला ध्येयावर लक्ष केंद्रित ठेवायला शिकवतो.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार १० ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



# आईच्या नावाने एक झाड जगवा अन ग्रामपंचायत कडून अकराशे रुपये बक्षीस मिळवा



ग्रामपंचायत वडगाव गु ंधा ता जि बीड येथील उपक्रम,,, बीड तालुक्यातील मौजे वडगाव गु ंधा येथे हरित महाराष्ट्र हा शासनाचा उपक्रम ग्रामपंचायत कार्यकारणी व लोक सहभागातून वृक्षारोपण चा उपक्रम राबवण्यात आला, या कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषद शाळा शासकीय इमारती शेतातील बांध, व सरकारी जागेत वृक्षारोपण करण्यात आले. या वृक्ष लागवड उपक्रम प्रसंगी जिल्हा परिषद शाळेतील मुला-मुलींना शाळेचे मुख्याध्यापक श्री दिलीप शिंदे सर यांनी झाडाचे महत्त्व पटवून देताना वृक्ष संवर्धन करणे काळाची गरज असून वृक्षांची संख्या आपल्या पृथ्वीवर वाढली नाही तर आपल्या सर्व प्राणी वर्गाचे अतोनात नुकसान झाल्याशिवाय राहणार नाही हे अवगत केले.. तदनंतर आईच्या नावाने एक झाड जगवा आणि ग्रामपंचायत कडू न अकराशे रुपये बक्षीस मिळवा या ग्रामपंचायत वडगाव गु ंधा च्या उपक्रमाबाबत बोलताना वडगावचे ग्रामपंचायत अधिकारी श्री रामेश्वर घाडगे यांनी उपक्रमाची माहिती देताना आपल्या भाषणात सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर आव्हान केले की आपले महाराष्ट्र शासन वृक्ष संवर्धन वृक्ष संगोपन हरित महाराष्ट्र अशा विविध या ेजना आपल्या सवा ंच्या भवितव्यासाठी राबवत आहेत. परंतु या वृक्ष लागवडीच्या कामांमध्ये लोक सहभागाची उणीव भासते तसेच झाडांची लागवड केल्यानंतर निसर्गाच्या प्रकोपाने जास्त प्रमाणात झाडे जगत नाहीत व त्याचे संवर्धन होत नाही त्यामुळे कुठ ेतरी त्यांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे हे आपण सर्वांनी लक्षात ठ ेवले पाहिजे. संत तुकाराम महाराज यांनी ५०० वर्षांपूर्वी आपल्या अभंगात प्राणी मात्र व झाडांची काय किंमत आहे हे त्यांनी सांगितलेले आहे त्यांच्या अभंगा प्रमाणे वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे,पक्षीही सुस्वरे आळवीती, या अभंगातून महाराजांनी समस्त सजीव सृष्टीला हा संदेश दिलेला आहे की निसर्गातील जंगल, झाड े,झुडपे आणि त्यात राहणारे पक्षी सुद्धा आपले सगे सोयरे आहेत, या सृष्टीमध्ये त्यांना जगण्याचा तेवढाच अधिकार आहे , झाडझुडप व पक्षी सुद्धा आपली स्तुती करतात हे आपण लक्षात ठेवले पाहिजे, मानव जातीने केलेली जंगलतोड, झाडतोडीमुळे वृक्ष संवर्धनाचे प्रमाण भरपूर कमी झाले असे झाल्यामुळे कित्येक पशुपक्षी संपुष्टात येऊन त्यांचा ऱ्हास झाला आहे. भविष्यात निसर्गातील झाडांची संख्या अशीच कमी होत राहिली तर आपल्याला आवश्यक असलेल्या प्राणवायूच्या अभावाने मानव प्राण्यांचा देखील ऱ्हास झाल्याशिवाय राहणार नाही म्हणून एक झाड आईच्या नावाने लावून त्याचे आपण वर्षभर संवर्धन करू व हीच काळाची गरज आहे.



स्वातंत्र्य दिन १५ ऑगस्ट २०२५ च्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वतयारी संदर्भात आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी (सा. प्र.) शैलेस सुर्यवंशी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, जिल्हा क्रिडा अधिकारी अरविंद विद्यागर संबधित अधिकारी उपस्थित होते.

# श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी संस्थानचे ह.भ.प वै.सदगुरु किसन बाबा महाराज यांच्या 27 व्या "पुण्यतिथी"निमित्त

## महंत ह.भ.प शांतीब्रम्ह गुरूवर्य नवनाथ बाबा महाराज यांच्या नेतृत्वाखाली आयोजित अखंड हरिनाम सप्ताह सांगता

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी संस्थानचे ह.भ.प वै.सदगुरु किसन बाबा महाराज यांच्या २७ व्या "पुण्यतिथी"निमित्त महंत ह.भ.प शांतीब्रम्ह गुरुवर्य नवनाथ बाबा महाराज यांच्या नेतृत्वाखाली आयोजित अखंड हरिनाम सप्ताह सांगता ह.भ.प.संजय महाराज पाचपोर यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. यावेळी लाखोंच्या संख्येने भाविक भक्तांचा भक्तीसागर उसळला होता. संघर्ष योद्धे मनोज जरांगे पाटील यांनी भ्रमणध्वनी द्वारे भाविकांशी बोलले. सोबतच खासदार बजरंग सोनवणे व माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी भाविकभक्तांशी अध्यात्मिक संवाद साधला. सामाजिक, राजकीय व विविध क्षेत्रातील मान्यवरांची यावेळी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



महत्वाचे मुद्दे..

- महाप्रसाद बंदीसाठी 70 किंटल साखर गाळप करण्यात आली. 1 लक्ष 70 हजारांपेक्षा अधिक भाविक भक्तांनी यावेळी या आध्यात्मिक पर्वणीचा लाभ घेतला. 50 पेक्षा अधिक पीकअप द्वारे या महाप्रसादाचे वाटप करण्यात आले होते.
- पिंपळनेर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक मधुसूदन घुगे यांनी वाहतूक नियंत्रण व्यवस्था व भाविकांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने योग्य नियोजन केले होते. यावेळी पीएसआय अर्जुन गोलवाल, गर्जे आप्पा यांच्यासह सर्व पोलिस ठाणे स्टाफ, होमगार्ड यांनी उत्कृष्ट काम केल्यामुळे मोठी ट्रॅफिक समस्या वेळेत निस्तारली.
- सलग 8 दिवस 30 हजारांपेक्षा अधिक भाविक भक्तांना पूर्णवेळ जेवायची व्यवस्था या ठिकाणी होती. यामध्ये परिसरातील 25 पेक्षा अधिक गावच्या भाकरी दैनंदिन रित्या येत होत्या..
- आरोग्याची काळजी घेण्यासाठी सलग 5 दिवस नाळवंडी प्राथमिक आरोग्य केंद्राची टीम कार्यरत होती. या आरोग्य पथकाकडून भाविक भक्तांच्या सर्दी, खोकला, ताप सारख्या आजारांवर उपचार केला जायचा..

# नातवाकडून सत्तूरने आजीवर जीवघेणा हल्ला; मायबापांनाही केलं गंभीर जखमी

## नशेच्या आहारी वीस वर्षीय युवकाचे कृत्य

परळी : प्रतिनिधीपरळी शहरातील तलाब कट्टा (फुलेनगर) परिसरात शनिवार दि.9 रोजी सायंकाळी ६.३०वा. सुमारास एक खळबळजनक घटना घडली आहे. नशेच्या आहारी गेलेल्या नातवाने पैशासाठी आजीवर जीवघेणा हल्ला केला. तर त्याला रोखण्यासाठी आलेले आई-वडीलसुद्धा गंभीर जखमी झाले आहेत. हल्लेखोर नातवाला संभाजीनगर पोलीसांनी शिताफिने ताब्यात घेतले आहे.ही हृदयद्रावक घटना तलाब कट्टा (फुलेनगर) परिसरातील कुरेशी कुटुंबात घडली. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, जुबेदा इब्राहिम कुरेशी या ८० वर्षीय वृद्धा घरी होत्या. त्यांचा नातू आरबाज रमजान कुरेशी(वय २० वर्षे) हा नशेच्या अवस्थेत घरी आला आणि आजीकडे पैशाची मागणी करू लागला. आजीने पैसे देण्यास नकार दिल्यामुळे संतप्त झालेल्या आरबाजने हातातील सत्तूरने थेट त्यांच्या तोंडावर वार केला. या भयंकर हल्ल्यात आजीची मरणासन्न अवस्था झाली आहे.त्याची आई समिना रमजान कुरेशी व वडील रमजान इब्राहिम कुरेशी तातडीने धावून आले, मात्र आरोपीने त्यांच्यावरही शस्त्राने हल्ला करत त्यांना गंभीर जखमी केले. त्यानंतर आरबाज सत्तूर हातात घेऊन घटनास्थळावरून पळून जाण्याचा प्रयत्न करीत होता.घटनेची माहिती मिळताच संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून केवळ पंधरा मिनिटांत आरोपीला ताब्यात घेण्यात पोलीस निरीक्षक ढोणे यशस्वी झाले. विशेष म्हणजे, आरोपीकडे धारदार शस्त्र असतानाही त्यांनी अतिशय शिताफीने आणि धाडसाने ही कारवाई केली.मरणासन्न अवस्थेत वृद्धेवर पुढील उपचारार्थ अंबाजोगाई येथील रुग्णालयात पाठविण्यात आले आहे.तसेच गंभीर जखमी आई-वडीलांवर प्राथमिक उपचारांनंतर अंबाजोगाई येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. या घटनेने संपूर्ण तलाब कट्टा परिसरात एकच खळबळ उडाली.पोलिसांनी घटनेची नोंद घेतली असून पुढील पोलीस प्रक्रिया सुरू आहे. अद्याप या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

# राज्याचे उद्योगमंत्री उदयजी सामंत यांची बाजीराव चव्हाण यांच्या बीडयेथील जनसंपर्क कार्यालयास सदिच्छा भेट.

## बीडमध्ये बाजीराव चव्हाण यांच्या वतीने उद्योग मंत्री उदयजी सामंत यांचे जंगी स्वागत





बीड प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री मा.श्री. उदयजी सामंत हे बीड जिल्हा दौऱ्यावर आले होते. त्यावेळी त्यांनी युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव (दादा) चव्हाण यांच्या युवासेना मराठवाडा जनसंपर्क कार्यालय बीड येथे सदिच्छा भेट दिली. भेटीदरम्यान त्यांच्यासोबत शिवसेना पक्षाचे प्रमुख नेते, शिवसेना सचिव मा.संजयजी मोरे, माजी खासदार राहुलजी शेवाळे, शिवसेना सचिव मा.भाऊसाहेब चौधरी, शिवसेना उपनेते विद्यमान आमदार मा. अर्जुनजी खोतकर, तसेच बीड जिल्ह्याचे संपर्क प्रमुख मा.बापूसाहेब मोरे हे सर्व शिवसेना पक्षाचे वरिष्ठ नेते मंडळी देखील सदिच्छा भेट देण्यासाठी आले होते. या भेटीवेळी युवासेना मराठवाडा निरीक्षक श्री.बाजीराव (दादा) चव्हाण यांच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री मा. उदयजी सामंत यांचे जेसिबिच्या माध्यमातून फुलांच्या, तोफांच्या अतिशबाजीने जंगी स्वागत करण्यात आले. तसेच त्यांच्या समवेत उपस्थित सर्व शिवसैनिक, युवासैनिक यांचे देखील हृदयपूर्वक स्वागत करण्यात आले. स्वागतासाठी युवासेनेचे सर्व पदाधिकारी, तसेच धर्मवीर प्रतिष्ठानचे सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राज्याचे उद्योग मंत्री उदयजी सामंत आणि शिवसेना वरिष्ठ नेत्यांच्या या महत्त्वपूर्ण सदिच्छा भेटीमुळे बीड जिल्ह्याला पुढेकाही महत्त्वपूर्ण विकासाची दिशा मिळेल, तसेच भविष्यात विकास योजनांना देखील मोठी चालना मिळेल. असा विश्वास कार्यकर्त्यांनी यावेळी व्यक्त केला आहे.

# श्री गजानन नागरी सहकारी बँक नेकनूर शाखेचा ग्राहक मेळावा

नेकनूर । प्रतिनिधी श्री गजानन नागरी सहकारी बँक लि., बीड - नेकनूर शाखेच्या वतीने आयोजित ग्राहक मेळावा नुकताच उत्साहात संपन्न झाला. बँक व ग्राहक यांच्यातील विश्वासाचे बंध अधिक घट्ट करणारा हा मेळावा, पारदर्शक व सेवा प्रधान बँकिंगच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अ‍ॅड. दत्तात्रय डोईफोडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून अ‍ॅड. राजेश तांगडे, संचालक अर्जुन बहिरवाळ, तसेच स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य सेवानंद कदम, पांडुरंग होमकर, जफर काझी, कल्याण भटे, अर्जुन सानप आदींची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे व्यवस्थापक विलास कु ंभेफळकर यांनी केले. बँकेचे शाखा व्यवस्थापक रवींद्र कुलकर्णी व कर्मचारी अमोल डोईफोडे, गणेश आनेराव, गणेश पोपळे, राहुल चौधरी, सोमनाथ शेळके यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन व व्यवस्थापन केले. या वेळी बँकेच्या विविध सेवा व योजनांची माहिती ग्राहकांना देण्यात आली. ठेवी, विविध कर्ज योजना, ठेवीवरील विमा सुरक्षा योजना, तसेच नुकतीच सुरू करण्यात आलेली केशर कर्ज योजना याबाबत उपयुक्त माहिती ग्राहकांसमोर मांडण्यात आली. कार्यक्रमात स्थानिक मान्यवर, डॉक्टर, व्यापारी, सराफ संघटनेचे पदाधिकारी व व्यावसायिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. डॉ. शिंदे, डॉ. वाणी, डॉ. खोमणे, डॉ. गणेश, डॉ. हाडे, डॉ. सोंडगे यांसह अनेक प्रतिष्ठित नागरिकांनी बँकेच्या कार्यपद्धतीचे व सेवाभावाचे मनःपूर्वक कौतुक केले. प्रमुख पाहुणे संचालक अर्जु ंन बहिरवाळ यांनी मुकादम व्यवसायातील अडचणी आणि बँकेच्या सहकार्याचे महत्त्व पटवून दिले. अ‍ॅड. राजेश तांगडे यांनी ग्राहकांचा वाढता विश्वास, बँकेची पारदर्शकता आणि तांत्रिक प्रगतीचा उल्लेख करून बँकेच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले स्थानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष अ‍ॅड. डोईफोडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात बँकेच्या यशस्वी वाटचालीत ग्राहक, कर्मचारी, संचालक मंडळ व स्थानिक समुदायाच्या समन्वयाचे योगदान महत्वाचे असल्याचे सांगितले. १९९४ मध्ये स्व. केशरबाई क्षीरसागर ऊर्फ काकू ंनी स्थापन केलेली ही बँक, आज ग्रामीण महाराष्ट्रातील आर्थिक परिवर्तनाचे प्रतीक बनली आहे. स्वावलंबी शेतकरी, व्यापारी आणि नागरिक घडवण्याच्या ध्येयाने सुरू झालेल्या या संस्थेने विश्वासार्हतेचा ठसा उमटवत विविध योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागात आर्थिक सक्षमतेचे नवे पर्व लिहिले आहे. ग्राहकाभिमुख सेवा, डिजिटल बँकिंग, एटीएम, मोबाईल सेवा, व्यवसाय, शेती व शिक्षणासाठी सुलभ कर्ज योजना, ठेवी सुरक्षित ठेवण्यासाठी विमा संरक्षण, आपल्या बँकेच्या एटीएम, मोबाईल बँकिंग, विमा संरक्षण आणि विविध कर्ज योजनांचा लाभ घ्यावा. आधुनिक तंत्रज्ञानासोबत बँकेचा सेवाभाव जोडला जाऊन तुमच्या आर्थिक प्रगतीला नवे बळ मिळू शकते.



# लाडक्या बहिणीसाठी आनंदवार्ता, कधी दुप्पट होणार हप्ता? आता मुख्यमंत्र्यांनी थेटच सांगितल

लाडकी बहीण योजनेने राज्यात देवाभाऊचे सरकार आले, हे सत्ताधारी सगळेच मान्य करतात. काल राखी पौर्णिमेच्या कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांनी सुद्धा लाडक्या बहिणींचे आभार मानले. त्यांनी ही योजना पुढील 5 वर्षे कायम राहील अशी ग्वाही सुद्धा दिली. तर योजनेत या योजनेत ज्यांनी घुसखोरी केली, त्यांचे अनुदान थांबवण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पण मानधनाची रक्कम दुप्पट कधी होणार याची प्रतिक्षा लाडक्या बहिणींना आहे. त्यावरीही मुख्यमंत्र्यांनी त्यांचे मत व्यक्त केले. गेल्यावर्षी ऑगस्ट महिन्यापासून लाडकी बहीण योजना राज्यात सुरू झाली. सुरुवातीला सरसकट सर्वच महिलांसाठी ही योजना लागू करण्याचे आश्वासन देण्यात आले. 1500 रुपये मानधनाची घोषणा झाली. तर विधानसभा निवडणूक दृष्टीटप्प्यात येताच मानधन 3000 रुपये करण्याचे सुद्धा जाहीर करण्यात आले. राज्याच्या तिजोरीत मोठी गंगाजळी असल्याचा दावा करण्यात आला होता. पण सरकार सत्तेवर आल्यावर या योजनेला मापदंड लागले. निकष जाहीर झाले. त्यात



अनेक महिला बाद झाल्या. तर मानधन दुप्पटीचे काय झाले हा प्रश्न सतत विचारण्यात येत होता. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल उत्तर दिले. योग्यवेळी लाडकी बहीण योजनेचे पैसे वाढवणार असे आश्वासन त्यांनी दिले. आता ती योग्य वेळ कधी येते याची वाट मात्र बहिणींना पाहावी लागेल, हे सूर्यप्रकाशा इतकं स्वच्छ आहे. या योजनेत काही भावांनी घुसखोरी केल्याचे उघड झाल्याने एकच खळबळ उडाली होती. त्यावर मुख्यमंत्र्यांनी मत व्यक्त केलं. या योजनेचा दुरुपयोग करणाऱ्यांचे मानधन थांबवण्यात आल्याचे ते म्हणाले. काहींनी योजनेसाठी थेट दुचाकीचा फोटो लावल्याचा किस्सा ही त्यांनी सांगितला. प्रत्येकाची पडताळणी करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. तर पात्र असलेल्या बहिणी डावल्या असतील, तर त्यांना लवकरच योजनेचा लाभ देण्यात राज्यातील बचत गटांद्वारे 25 लाख लखपतीदीदी तयार झाल्या आहेत. यंदा आणखी 25 लाख लखपतीदीदी होतील. पुढील काही वर्षांत ही संख्या एक कोटींच्या घरात जाईल. लखपतीदीदी योजनेत महाराष्ट्र देशात अव्वल असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

# अवयवदान हे सर्वश्रेष्ठ दान - डॉ. किशोर ठाकूर

माजलगाव प्रतिनिधी दिनांक 8 ऑगस्ट 2025 भारतामध्ये अवयव दान करणे काळाची गरज असून त्यासाठी जागृती होणे गरजेचे आहे. यामुळे अनेकांना जीवदान मिळणार असते म्हणून अवयवदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे असे प्रतिपादन माजलगाव ग्रामीण रुग्णालयाचे मेडिकल ऑफिसर डॉ.किशोर ठाकूर यांनी केले. ते श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित अवयवदान- श्रेष्ठदान या कार्यक्रमात बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद




देवर्षी होते. तसेच व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. गजाननवहोन्ना,डॉ. युवराज मुळये, प्रा.अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा.परमेश्वर खेत्री होते.

पुढे बोलताना डॉ. किशोर ठाकूर यांनी अवयवदान याचे महत्व सांगून प्रत्येकांनी अवयवदान करावे असे आवाहन केले. यासाठीची नोंदणी कशी करावयाची यासंदर्भात सविस्तर असे मार्गदर्शन ही केले.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी म्हणाले की, मरावे परी किर्तीरूपी उरावे या उक्तीनुसार आपल्या अवयव दानामुळे जर कोनाचे जीवन उभे राहत असेल तर त्याच्या एवढे महान कार्य नाही.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यकर्माधिकारी डॉ. ज्ञानेश्वर गवते यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. शिवशंकर मिटकर यांनी केले तर आभार प्रा.अशोक होके यांनी मानले. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक तसेच प्राध्यापक कर्मचारी उपस्थित होते.

## मानवतेचा खरा चेहरा-अभिजित वैध..!

९ ऑगस्ट १९८० हा दिवस केवळ एका व्यक्तीचा जन्मदिवस नाही, तर करुणा, जिव्हाळा आणि मानवतेचा नवा प्रवास सुरू झाल्याचा दिवस आहे. अभिजित वैध हे नाव उच्चारलं की, डोळ्यासमोर येतो तो प्रेमाचा आणि जिव्हाळ्याचा महासागर, ज्याने आपल्या जीवनाची प्रत्येक श्वास समाजसेवेला अर्पण केली आहे. केवळ १८व्या वर्षापासून त्यांनी घेतलेला निर्धार स्वतःसाठी नाही, तर गरजूंसाठी जगायचं आजही त्यांच्या प्रत्येक कृतीत दिसून येतो. जिव्हाळा बेघर निवारा केंद्र हे त्यांचं केवळ कार्यस्थान नाही, तर ते एक उबदार घर आहे जिथे ६० पेक्षा जास्त वयोवृद्धांची काळजी घेतली जाते. अनाथांना, घरदार हरवलेल्या जीवांना, त्यांनी आईच्या मायेने, वडिलांच्या आधाराने आणि मित्राच्या जिव्हाळ्याने कवटाळलं आहे. आजच्या स्वार्थी जगात, स्वतःच्या सोयीसाठी माणसं बदलतात, पण अभिजित वैध मात्र निस्वार्थ प्रेम काय असतं, हे जिवंत उदाहरण आहेत. त्यांच्या डोळ्यातील करुणा, त्यांच्या हातातील सेवा, आणि त्यांच्या मनातील जिद्द यांना शब्दांत बांधणं अशक्य आहे. अनेक मान्यवरांनी आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या, पण खरं तर प्रत्येक ज्येष्ठ नागरिकाचा आशीर्वाद, प्रत्येक अनाथाच्या डोळ्यातील आनंदाश्रू, आणि प्रत्येक भुकेल्या पोटाची तृप्त हसू हाच त्यांचा सर्वात मोठा पुरस्कार आहे. अभिजित वैध, तुम्ही केवळ एक व्यक्ती नाही, तुम्ही चालतं-बोलतं मंदिर आहात,तुम्ही दिलेला प्रेमाचा आणि सेवाभावाचा वारसा,अनेकांच्या आयुष्याला नवी दिशा देणारा आहे.मानवतेचा हा दीप उजळत राहो..वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!



नूर एज्युकेशनल अँड वेल्फेअर सोसायटी, बीड द्वारा संचलित अलहुदा उर्दू हायस्कूल, शहेनशहा नगर येथे शालेय परिसरात हिरवाई वाढविण्यासाठी वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात शाळेचे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. या वृक्षारोपण कार्यक्रमाचे नेतृत्व मुख्याध्यापक डॉ. सिराज खान यांनी केले. त्यांच्या सोबत सांस्कृतिक विभाग प्रमुख शेख अब्दुल हमीद, परीक्षा प्रमुख शेख मोइजुद्दीन, सहशिक्षक सय्यद रहेबर, शिपाई शेख मसूद आदी मान्यवर उपस्थित होते.

# ७ वर्षांपासून बेपत्ता असलेला आदिवासी मुलगा शोधण्यात यश; एकलव्य भिल्ल समाज संघटनेचे अथक प्रयत्न फळाला

बीड (प्रतिनिधी)- 2017 सालापासून बेपत्ता असलेला खलवट लिंबगाव येथील आदिवासी भिल्ल समाजाचा मुलगा राजू काकासाहेब माळी अखेर 7 वर्षांनंतर शोधून काढण्यात आला आहे. या यशामागे मुलाचे आई-वडील आणि एकलव्य भिल्ल समाज संघटना, महाराष्ट्र राज्याचे कार्याध्यक्ष ॲड. सूर्यकांत पवार यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न कारणीभूत ठरले. राजू माळी हा 2017 मध्ये शाळेतून अचानक बेपत्ता झाला होता. त्या वेळपासून त्याच्या कुटुंबाने अनेक वेळा प्रशासनाशी



संपर्क साधला, मात्र कोणतीही ठोस मदत मिळाली नाही. शालेय प्रशासन आणि स्थानिक अधिकाऱ्यांकडूनही असहकार मिळाल्याने मुलाच्या पालकांनी संघटनेचे कार्याध्यक्ष ॲड. सूर्यकांत पवार यांच्याकडे मदतीसाठी धाव घेतली. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत ॲड. पवार यांनी संबंधित जबाबदार सांभाळ करणारांविरोधात तक्रार दाखल करून कार्यवाही सुरू केली. त्यानंतर बीड येथील धाडसी पथक - मानव तस्कर विरोधी पथकाच्या प्रमुख पल्लवी जाधव मॅडम यांनी सदर प्रकरणाचा तपास हातात घेतला. तपासाच्या आधारे, अखेर 7 वर्षांपासून बेपत्ता असलेला राजू शोधून त्याला आई-वडिलांच्या ताब्यात सुरक्षितपणे देण्यात आले. या संवेदनशील क्षणी पीएसआय पल्लवी जाधव, ॲड.सूर्यकांत पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांची उपस्थिती होती. राजूला पुन्हा मिळाल्यामुळे कुटुंबाच्या डोळ्यांतून आनंदाश्रू ओघळले. या घटनेनंतर आदिवासी समाजात एक दिलासादायक भावनिक लहर निर्माण झाली आहे. समाजातील दुर्लक्षित घटकांपर्यंत न्याय पोहोचवण्यासाठी अशा संघटनांचे योगदान हे अत्यंत मोलाचे असल्याचे यानिमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाले.

# १ कोटी १ लाख ५२ हजार रुपये किमतीच्या गुटख्यासह मुद्देमाल जप्त

केज। प्रतिनिधी केज शहरा नजीक एका पेट्रोल पंपा जवळ एक आयशर टेम्पो केज पोलिसांनी पकडून १ कोटी १ लाख ५२ हजार रुपये किमतीच्या गुटख्यासह मुद्देमाल जप्त करून दोन आरोपींना केज पोलिसांनी गजाआड केले आहे. दिनांक ७ ऑगस्ट २०२५ रोजी केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांना एका गुप्त खबऱ्यामार्फत माहिती मिळाली की, बीड वरून केज शहरातून कळंबच्या दिशेने एक आयशर टेम्पो बेकायदेशीर रित्या, विनापरवाना गुटक्याची व सुगंधी तंबाखूची वाहतूक करत आहे व सदर माल हा कळंबकडे घेऊन जात असल्याची माहिती मिळाली. पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांना सदर माहिती मिळताच त्यांनी तात्काळ एक पथक केज कळंब रोड च्या दिशेने रवाना केले. दुपारी १-३० वाजण्याच्या सुमारास केज ते कळंब रोडवर एचपी पेट्रोल पंपा समोर सदर पथक हे सापळा लावून थांबले असता. एक अशोक लिलँड कंपनीचा आयशर टेम्पो पासिंग क्र.डी डी०१एस ९४४२ सदर टेम्पो हा केज कडून येत असताना सदर पथकातील कर्मचाऱ्यांनी आयशर टेम्पो अडवून उभा करून टेम्पोची झडती घेतली असता सदर टेम्पोमध्ये वेगवेगळ्या कंपनीचा गुटखा, सुगंधित तंबाखू मिळून आली. सदर



गुटक्याची व सुगंधित तंबाखू ७४ लाख ५२ हजार रुपये किंमतीची, तसेच एक अशोक लिलँड कंपनीचा आयशर टेम्पो जुना वापरता अंदाजे किंमत २७ लाख रुपये असा एकूण १ कोटी १ लाख ५२ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त करून दोन आरोपींना अटक करण्यात आले आहे. सदर आयशर टेम्पो चा चालक रईसोद्दीन अमीरोद्दीन शेख वय ५० वर्षे रा. मिल्लत नगर ओकाला रोड ता. जि. रतलाम, मध्यप्रदेश राज्य, परशुराम मोहन गायकवाड रा.एकनाथवाडी ता.पाथर्डी जि.अहिल्यानगर ह.मु. बीड यांनी स्वतःच्या फायद्या करिता विनापरवाना, बेकायदेशीररित्या, महाराष्ट्र राज्यात आरोग्याच्या दृष्टीने बंदी घातलेली असताना राजनिवास पान मसाला, राज निवास पान मसाला तंबाखू, डायरेक्टर स्पेशल पान मसाला, डायरेक्टर स्पेशल पान मसाला तंबाखू चा माल चोरटी विक्री करण्याकरता जवळ बाळगून टेम्पोमध्ये घेऊन जालीमसिंग रा. बेहरापूर(पूर्ण नाव माहित नाही) गुटखा माल भरून देऊन रुपेश मालपाणी रा.कळंब जि.धाराशिव यास सदर माल पोच करण्यासाठी घेऊन जात असताना मिळून आले म्हणून केज पोलीस ठाणे येथे केज पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक उमेश निकम यांच्या फिर्यादीवरून गु.र. नं.४३०/ २०२५ कलम १२३, २३३, २७४, २७५ भारतीय न्याय संहिता २०२३, सहकलम २६(२), २७(३), ३०(२),५९, अन्नसुरक्षा मानके अधिनियम २००६ अन्वये रईसोद्दीन अमिरोद्दीन शेख, परशुराम मोहन गायकवाड, जालीमसिंग (पूर्ण नाव माहित नाही), रुपेश मालपाणी या चौघा जणा विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदीप मांजरमे हे करीत आहेत.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com